# महाराष्ट्र शासन

## राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष, महाराष्ट्र राज्य, मुंबई

८ वा मजला, न्यु एक्सलसियर इमारत, ए.के. नायक मार्ग, फोर्ट, मुंबई - ४००००१.

दुरध्वनी : ०२२-२२०१६१५९ वेबसाईट : http://www.mahacet.org ई-मेल:cetcell@mahacet.org


क्र.तंशिप्र-१२२४/प्र.क्र०३/जाहिर सूचना/२०२५/ दिनांक -०९.०५.२०२५

## जाहीर सूचना

**शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये तंत्रशिक्षण विभागातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या प्रवेशाकरीता एसईबीसी आणि ओबीसी प्रवर्गातून प्रवेश घेतलेल्या उमेदवारांनी सादर करावयाच्या जात वैधत प्रमाणपत्रबाबत.**

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत तंत्रशिक्षण विभागातील विविध पदवी व पदव्युत्तर पदवी या अभ्यासक्रमाच्या प्रवेश प्रक्रिया राबविण्यात आले आहे. सदरील प्रवेश प्रकियेमध्ये ज्या उमेदवारांना एसईबीसी आणि ओबीसी प्रवर्गातून प्रवेश घेतलेला आहे, परंतू काही उमेदवारांनी जात वैधता प्रामणपत्र सादर केले नाही अशा उमेदवारांना जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यासाठी शासनाने वेळोवेळी मुदतवाढ दिलेली आहे. आजतागायत सदरील प्रवर्गातील उमदेवारांनी जात वैधता प्रमाणपत्र सदर केले नाही अशा उमेदवारांना शासन निर्णय क्रमांक संकिर्ण-२०२४/प्र.क्र.७५/आरक्षण-५, दिनांक ०२ मे, २०२५ अन्वये जात वैधता प्रमाणपत्र सादर करण्यास सदर शासन निर्णयाच्या दिनांकापासून अधिकचा तीन महिन्यांचा कालावधी देण्यात आला आहे.

त्याअनुषंगाने एसईबीसी आणि ओबीसी प्रवर्गातील उमेदवारांनी जात वैधता प्रमाणपत्र अपलोड केले नाही अशा सर्व उमेदवारांना पुढीलप्रमाणे कळविण्यात येत आहे -

१. ज्या उमेदवारांकडे जात वैधत प्रामणपत्र उपलब्ध आहे, परंतू प्रवेश प्रक्रियामध्ये अपलोड केले नाही. अशा उमेदवारांनी त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र तात्काळ उमेदवारांच्या लॉगीनमधून अपलोड करावे.

२. ज्या उमेदवारांना अद्याप पर्यंत त्यांचे जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त झालेले नाही अशा उमेदवारांनी संबंधीत जिल्हा पडताळणी समितीकडून आपले जात वैधता प्रमाणपत्र प्राप्त करुन घ्यावे आणि तात्काळ उमदेवारांच्य लॉगीन मधून अपलोड करावे.

३. तसेच ज्या उमेदवारांनी जात वैधत प्रमाणपत्र महाविद्यालयामध्ये जमा केले आहे परंतू कॅप पोर्टलमध्ये अपलोड केल नाही अशा उमेदवारांनी तात्काळ उमेदवाराच्या (स्वत:च्या) लॉगीन मधून अपलोड करावे.

सदरील शासनाने दिलेल्या अधिकच्या मुदतीत जात वैधता प्रमाणपत्र सादर करु न शकलेल्या उमेदवारांचे प्रवेश रद्द झाल्यास त्यास संबंधित उमेदवार जबाबदार राहील, यांची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

सही/-
(दिलीप सरदेसाई, भा.प्र.से.)
आयुक्त
राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्ष,
महाराष्ट्र राज्य, मुंबई